ePaper
वर्ष - 8 । अंक - 347 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
www.mahaenews.com । शनिवार, दि. 26 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## लोकप्रतिनिधींच्या मागणीला आयुक्तांचा 'खो'




### आतील पानांत
- 'मिस्टर ३६०' इंग्लंडमध्ये गरजला!
- रेसलिंग स्टार हल्क होगन यांचं निधन
- मालदीव मित्र असल्याचा अभिमान!
- राजस्थानमध्ये इमारत कोसळली


## सरकारमधील आठ मंत्र्यांची 'विकेट'

# 'रमीसम्राट' कोकाटेंची विकेट पडणार!

## मंत्रीमंडळात फेरबदलची शक्यता; शिंदेचे चार, भाजपमधूनही दोघे रडारवर

**। मुंबई / पुणे / बीड । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**राज्यातील राजकारण पुन्हा एकदा जोरदार घडामोडींच्या वळणावर असल्याचा दावा करत सामना या शिवसेनेच्या मुखपत्रातून महायुती सरकारमधील आठ मंत्र्यांची 'विकेट' लवकरच पडणार असल्याचे भाकीत करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर काही नेते व मंत्री आधीच वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत, तर काहींवर कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं आहे.**

विधानसभा अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांना बाजूला करून नाराज असलेल्या सुधीर मुनगंटीवार यांना संधी दिली जाईल, असाही दावा करण्यात आला आहे. 100 दिवसांच्या कार्यक्रमातही यांची समाधानकारक नसल्याची दावा करण्यात आला आहे. सामनाने 'हिटलिस्ट'वर असलेल्या मंत्र्यांची नावे स्पष्टपणे दिली आहेत. यामध्ये माणिकराव कोकाटे, संजय शिरसाट, योगेश कदम, नरहरी झिरवळ, नितेश राणे, जयकुमार गोरे, भरत गोगावले आणि दादा भुसे यांचा समावेश आहे. या मंत्र्यांविषयी झालेल्या वादग्रस्त घटनांमुळे त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.सामना दैनिकाने असा दावाही केला आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एक मोठा राजकीय 'धक्कातंत्र' राबवण्याच्या तयारीत असून, मंत्रीमंडळात फेरबदल होण्याची शक्यता आहे. याच दरम्यान सुधीर मुनगंटीवार यांना विधानसभा अध्यक्ष करण्याची चर्चा आहे, तर सध्याचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना मंत्रीपद दिले जाऊ शकते, अशीही अटकळ वर्तवण्यात आली आहेविधिमंडळाच्या अधिवेशनावेळी सभागृहात मोबाइलवर ऑनलाइन रमी (पत्त्यांचा खेळ) खेळताना दिसल्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. तर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ) राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मात्र सावध प्रतिक्रिया दिली आहे.

### माणिकराव कोकाटे

सातत्याने वादग्रस्त विधाने करत सुटलेल्या आणि विधानसभेत जुगार खेळताना सापडल्याने संतापात भर पडली आहे. अजित पवार यांनीही त्यांच्या गच्छंतीवर थेट बोलले नसले



### संजय शिरसाट

मंत्री संजय शिरसाट यांच्या घरी नोटांची बंडले दिसून आल्याने वादात अडकले आहेत. त्यापूर्वी हॉटेल लिलावामध्येही त्यांच्यावर आरोप करण्यात आले. त्यांच्या मुलावरही आरोप करण्यात आले. माणिकराव कोकाटे आणि संजय शिरसाट सातत्याने वादाच्या केंद्रस्थानी आहेत.

### योगेश कदम

योगेश कदम सावली बारमुळे अडचणीत आले आहेत. शिवसेना ठाकरे गटाने त्यांच्यावर सातत्याने कडाडून हल्लाबोल केला आहे.

### नरहरी झिरवळ

नरहरी झिरवळ यांच्यावर कार्यकर्त्यांशी असलेला संवाद अभाव आणि क्षेत्रातील अपयशाचे आरोप होत आहेत.

### नितेश राणे

अत्यंत वादग्रस्त वक्तव्यांनी रडारवर असलेल्या नितेश राणे यांच्याही मंत्रीपदावर पाणी फेरले जाईल, असा दावा करण्यात आला आहे.

### जयकुमार गोरे

महिलेकडून झालेल्या आरोपानंतर जयकुमार गोरे सुद्धा वादाच्या केंद्रस्थानी आले होते. जयकुमार गोरे यांना ग्रामविकास खात्याचा कारभार देण्यात आला आहे.

### दादा भुसे

हिंदी सक्तीच्या निर्णयाने आणि शालेय शिक्षण विभागातील अनावश्यक निर्णयांमुळे आणि त्यामधून निर्माण झालेल्या वादांमुळे दादा भूसे यांना फारशी समाधानकारक कामगिरी करता आलेली नाही.

### आता माझे कार्यकर्ते बोलतील

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत आहेत. वेगवेगळी वादग्रस्त वक्तव्ये आणि विधीमंडळाच्या अधिवेशनावेळी सभागृहात मोबाइलवर ऑनलाइन रमी (पत्त्यांचा खेळ) खेळताना दिसल्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. सभागृहाचं कामकाज चालू असताना कोकाटे मोबाइलवर रमी खेळत असल्याचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर होत आहे. यासह विरोधकांनी कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. त्यांच्या कृत्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील नाराजी व्यक्त केली होती. तर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मात्र सावध प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार म्हणाले, "मी आधी कृषीमंत्री कोकाटे यांच्याबरोबर समोरासमोर चर्चा करेन आणि त्यानंतर पुढील निर्णय घेईन." दरम्यान, कोकाटे यांची कृषीमंत्रिपदावरून उचलबांगडी होणार असल्याची चर्चा सुरू असतानाच ते गुरुवारी (२४ जुलै) धुळे जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेले आहे. धुळ्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना कोकाटे म्हणाले, "मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. आता माझे कार्यकर्ते बोलतील."कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे दोन दिवसीय धुळे जिल्हे दौऱ्यावर असून गुरुवारी रात्री उशिरा त्यांचे शहरात कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात आले.

### माणिकराव कोकाटे काय म्हणाले?

यावेळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांना काही प्रश्न विचारले. मात्र, कोकाटे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलणं टाळलं. त्यांचा एक सहकारी म्हणाला, "चर्चा बरीच झाली आता कामं करू." तरीदेखील अजित पवारांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारल्यावर कोकाटे म्हणाले, "मी माझी भूमिका कालच स्पष्ट केली आहे. आता येणाऱ्या काळात आमचे कार्यकर्तेच बोलतील."उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, "कृषीमंत्री कोकाटे यांच्या बाबतीत मला जी माहिती मिळाली ती घटना सभागृहाच्या आत घडलेली आहे. आता हे तुम्हालाही माहिती आहे की विधानभवनाचा परिसर विधानसभेचे अध्यक्ष व विधानपरिषदेच्या सभापतींच्या अखत्यारीत येतो. कृषीमंत्र्यांच्या व्हिडीओबाबत विधानसभा अध्यक्षांनी आणि विधानपरिषदेच्या सभापतींनी देखील चौकशी सुरू केली आहे. माणिकराव कोकाटे मला अद्याप भेटलेले नाहीत. सोमवारी माझी व त्यांची भेट होईल. तेव्हा मी त्या कथित व्हिडीओबाबत त्यांच्याशी बोलेन."मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. आता माझे कार्यकर्ते बोलतील.

# पुणे, मुंबईतील बेकायदा कॉल सेंटरवर छापे!

## ‘सीबीआय’कडून बँक अधिकाऱ्यांसह चौघांविरुद्ध गुन्हा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) पुणे, मुंबईतील कॉल सेंटरवर छापा टाकून तिघांना अटक करण्यात आली. या प्रकरणात एका बँक अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. एकूण चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अटक करण्यात आलेल्या तिघांना ‘सीबीआय’ने मुंबईतील विशेष न्यायालयात हजर केले असता, त्यांना न्यायालयाने पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.**




‘सीबीआय’ने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकानुसार, पुणे, मुंबईतील कॉल सेंटरमधून अमेरिकन नागरिकांची फसवणूक करण्यात येत असल्याची माहिती ‘सीबीआय’च्या मुंबई कार्यालयाला मिळाली होती. फसवणुकीतून मिळालेली रक्कम बनावट बँक खात्यात वळविण्यात आली होती.

संबंधित बँक अधिकारी व आरोपींनी संगनमत करून बनावट कागदपत्रांद्वारे बँक खाते उघडल्याची माहिती मिळाली होती. काही रक्कम हवालामार्फत हस्तांतरित केली जायची. दरमहा साधारणपणे तीन ते चार कोटी रुपयांची फसवणूक केली जात होती.याबाबतची माहिती ‘सीबीआय’च्या पथकाला मिळाली. त्यानुसार, कॉल सेंटरचालकासह कर्मचाऱ्यांच्या सदनिकांवर छापे टाकून रोकड जप्त करण्यात आली.

कॉल ल सेंटरमधील एका कर्मचाऱ्याच्या सदनिकेतून अमली पदार्थही जप्त करण्यात आले. या कारवाईत ‘सीबीआय’च्या पथकाने २७ मोबाइल संच, १७ लॅपटॉप, आभासी चलन, रोकड असा मुद्देमाल जप्त केला.‘सीबीआय’च्या पथकाने सात ठिकाणी कारवाई केली. अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींना मुंबईतील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने तिघांना ३० जुलैपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. आरोपींनी फसणूक करण्यासाठी समाजमाध्यमातील संपर्क यंत्रणेचा वापर केल्याचे उघडकीस आले आहे. आभासी चलनात गुंतवणूक, तसेच गिफ्ट कार्डच्या आमिषाने आरोपींनी फसवणूक केली.बनावट कॉल सेंटरच्या माध्यमातून आरोपी दरमहा तीन ते चार कोटी रुपये मिळवित होते.

फसवणुकीतून मिळालेली रक्कम आरोपी बनावट नावाने उघडलेल्या बँक खात्यात हस्तांतरित करायचे. आरोपींना काही रक्कम हवालाच्या माध्यमातून मिळाली होती. आरोपींकडून दहा लाख २० हजार, तसेच सहा लाख ९४ हजार रुपये मूल्य असलेले आभासी चलन, १५० ग्रॅम अमली पदार्थ, लॅपटॉप, मोबाइल संच असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणाचा सीबीआय मुंबई कार्यालयाकडून तपास करण्यात येत आहे. यापूर्वी पुणे पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेने खराडी भागातील एका कॉल सेंटर छापा टाकला होता.

### चार कोटी रुपयांची फसवणूक

बनावट कॉल सेंटरच्या माध्यमातून अमेरिकन नागरिकांची फसवणूक करण्यात आली होती. फसवणूक प्रकरणात मुंबई, तसेच गुजरातमधील आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते.‘सीबीआय’ने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकानुसार, पुणे, मुंबईतील कॉल सेंटरमधून अमेरिकन नागरिकांची फसवणूक करण्यात येत असल्याची माहिती ‘सीबीआय’च्या मुंबई कार्यालयाला मिळाली होती. फसवणुकीतून मिळालेली रक्कम बनावट बँक खात्यात वळविण्यात आली होती. संबंधित बँक अधिकारी व आरोपींनी संगनमत करून बनावट कागदपत्रांद्वारे बँक खाते उघडल्याची माहिती मिळाली होती. दरमहा साधारणपणे तीन ते चार कोटी रुपयांची फसवणूक केली जात होती.

---

# मविआबाबतचे निर्णय स्थानिक कार्यकारिणीला

## राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक महाविकास आघाडी म्हणून लढवायची की नाही, याचा निर्णय घेण्याचा अधिकार स्थानिक कार्यकारिणीला दिला आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणून तसा अधिकार स्थानिक पदाधिकाऱ्यांना दिला आहे,’ अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आगामी निवडणुकीतील महाविकास आघाडीसंदर्भात भाष्य केले.**



पक्षातील ज्येष्ठ नेत्यांची समिती स्थापन करा आणि प्राथमिक स्वरूपात चांगल्या उमेदवारांची यादी महिन्याभरात द्या. त्यावर तातडीने निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे आणि प्रदेश सरचिटणीसपदी आमदार रोहित पवार यांची निवड झाल्याच्या पार्श्वभूमीवर शहर राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. शहराध्यक्ष प्रशांत जगताप, आमदार बापूसाहेब पठारे, ज्येष्ठ नेते अंकुश काकडे, रवींद्र माळवदकर, श्रीकांत पाटील, माजी स्थायी समिती अध्यक्षा अश्विनी कदम यावेळी उपस्थित होते.महापालिकेसाठी सत्ताधारी पक्षाने प्रभाग रचना बदलली आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवारीबाबतचा निर्णय शेवटच्या क्षणी झाला. त्यामुळे काही उमेदवारांना पराभव पत्करावा लागला. महापालिका निवडणूक महाविकास आघाडी म्हणून लढवायची, की नाही, याचा निर्णय प्रदेश स्तरावर होईल. मात्र, तो लवकरात लवकर घ्यावा, अशी मागणी प्रशांत जगताप यांनी केली होती.

हा धागा पकडून शशिकांत शिंदे यांनी तसे अधिकार स्थानिक पातळीवर देत असल्याचे जाहीर केले.दरम्यान, रोहित पवार यांनीही कार्यकर्त्यांना ताकदीने काम करण्याची सूचना केली. ते म्हणाले, ‘लोकसभा निवडणुकीतील यशानंतर विधानसभा निवडणुकीत हवा गेल्याने पराभव स्वीकारावा लागला. लोकांपर्यंत पोहोचण्यापर्यंत सर्वच कमी पडले. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लोकांचे प्रश्न घेऊन पुढे जावे लागले. लोकांची कामे करणाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल झाले, तर नेते त्यांच्या मागे उभे राहतील. आत्ताची वेळ संघर्षाची आहे. ऐनवेळी पक्षाला सोडून जाणार असाल, तर राजकारणात आलाच कशाला, असे विचारावे लागेल. मात्र, सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावे लागतील. कार्यकर्त्यांना ताकद द्यावी लागेल.’पक्षातील ज्येष्ठ नेत्यांची समिती स्थापन करा आणि प्राथमिक स्वरूपात चांगल्या उमेदवारांची यादी महिन्याभरात द्या. त्यावर तातडीने निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### आत्ताची वेळ संघर्षाची आहे

राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे आणि प्रदेश सरचिटणीसपदी आमदार रोहित पवार यांची निवड झाल्याच्या पार्श्वभूमीवर शहर राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. शहराध्यक्ष प्रशांत जगताप, आमदार बापूसाहेब पठारे, ज्येष्ठ नेते अंकुश काकडे, रवींद्र माळवदकर, श्रीकांत पाटील, माजी स्थायी समिती अध्यक्षा अश्विनी कदम यावेळी उपस्थित होते.

## प्राधिकरणाच्या प्रॉपर्टी फ्री होल्ड करण्यास आयुक्तांचा विरोध

# लोकप्रतिनिधींच्या मागणीला आयुक्तांचा 'खो'

## प्रशासनाच्या विरोधात लोकप्रतिनिधींचा रोष वाढणार

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील मालमत्ता भाडेपट्टा करारमुक्त (फ्री होल्ड) करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून होत असतानाच महापालिका प्रशासनाने याला नकार दिला आहे.**




प्राधिकरणाने भाडेपट्ट्याने दिलेले, विकसित केलेले आणि महापालिकेस हस्तांतरीत केलेले औद्योगिक भूखंड तसेच सार्वजनिक क्षेत्राखालील भूखंड भाडेपट्टा करारमुक्त करू नयेत, ही महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भूमिका आहे. त्यांनी याबाबत राज्य शासनाला पत्र पाठविले आहे.सन २०२१मध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे पुनर्गठन झाले असून, ते पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात (पीएमआरडीए) विलीन झाले. त्यानंतर प्राधिकरणाच्या मालमत्तांचे विभाजन पिंपरी महापालिका आणि पीएमआरडीए या दोन संस्थांमध्ये करण्यात आले.

भाडेपट्ट्याने दिलेल्या, विकसित झालेल्या भूखंडांची आणि सार्वजनिक सुविधांच्या आरक्षणाखालील अतिक्रमित भूखंडांची मालकी व ताबा महापालिकेकडे सोपवली आहे. यामध्ये ७ हजार ७०७ निवासी, ८३७ औद्योगिक आणि १ हजार ४२६ निवासी अशा एकूण ९ हजार ९७० भूखंडांचा समावेश आहे. ती मालमत्ता तब्बल ४० वर्षांपूर्वी विकसित करण्यात आली असून, ती ९९ वर्षांच्या भाडेपट्टा करारानुसार वाटप झाल्यामुळे पुनर्विकास, वारस नोंदी व हस्तांतरण प्रक्रियेत मालमत्ताधारकांना तांत्रिक अडचणी भेडसावत आहेत.

हा विषय पावसाळी अधिवेशनातही चर्चिला गेला होता. महापालिका प्रशासनाने मालमत्ता भाडेपट्टा करारमुक्त करण्याला स्पष्ट विरोध दर्शविला आहे. प्राधिकरणामुळे भाडेपट्ट्याने दिलेले, विकसित झालेले आणि महापालिकेस हस्तांतरीत झालेले औद्योगिक भूखंड भाडेपट्टा करारमुक्त केले जाऊ नयेत, असा स्पष्ट अभिप्राय आयुक्त शेखर सिंह यांनी दिला आहे.

### महापालिकेला 214 कोटींचे उत्पन्न

भूखंडधारकांच्या मृत्यूनंतर वारसांची नोंदणी करणे, विनंतीनुसार नाव वाढवणे किंवा कमी करणे, 'नाहरकत' दाखल देणे, अशा विविध व्यवहारांमुळे सन २०२१पासून १८ जून २०२५पर्यंत महापालिकेला २१४ कोटी ६ लाख ३१ हजार ६५८ रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

> महापालिकेकडे हस्तांतरित झालेल्या भूखंडांचे भाडेपट्टा करारमुक्तीसाठी अधिमूल्याची रक्कम सर्वप्रथम निश्चित करून घेतली पाहिजे, ज्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. त्यानंतर शासन जो निर्णय घेईल, त्याची आम्ही पूर्ण अंमलबजावणी करू.
>
> -शेखर सिंह, आयुक्त, महापालिका

---

## उपमुख्यमंत्र्यांकडून कौतुकाने विद्यार्थी भारावले!

## गुणवंत विद्यार्थ्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून सन्मान

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील दहावीत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त झालेल्या पाच गुणवंत विद्यार्थ्यांचा आज गौरव करण्यात आला. महापालिकेच्या वतीने या विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचा धनादेश उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते देण्यात आला.**




तसेच विद्यार्थ्यांना डीबीटीच्या साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री पवार यांनी विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक करतानाच अशा उपक्रमांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रकल्पांचा समावेश करून प्रशिक्षण अधिक अद्ययावत व गुणवत्तापूर्ण करावे, असे मत मांडले.

तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी शिक्षण विभागाची सक्षम हस्तपुस्तिका, इंग्रजी हस्तपुस्तिका, डिजिटल लर्निंग बालवाडी दिनदर्शिका, प्राथमिक दिनदर्शिका, पालक दिनदर्शिकेचे उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी उपमुख्यमंत्री पवार यांचा विद्यार्थ्यांनी बनवलेल्या कला वस्तू देऊन सन्मान केला. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, प्रशासनाधिकारी संगीता बांगर आदी उपस्थित होते.


आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या प्रगतीचे आणि विविध नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे सविस्तर सादरीकरण केले.

शिक्षण क्षेत्रात झालेल्या लक्षणीय बदलांची माहिती यावेळी आयुक्त सिंह यांनी दिली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांमध्ये गुणात्मक वाढ झाली असून यामध्ये अप्रगत विद्यार्थ्यांचे प्रमाण २५ टक्क्यांवरून १३ टक्क्यांपर्यंत घटले आहे, तर प्रगत विद्यार्थ्यांचे प्रमाण ०.५ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. प्राथमिक स्तरावरील इंग्रजी कौशल्य विकासात सरासरी १८ टक्के वाढ दिसून आली असून बालवाडीमध्ये २५ टक्क्यांची गुणात्मक वाढ आणि ६ टक्के प्रवेश वाढ नोंदवली गेल्याची माहिती आयुक्त सिंह यांनी दिली.

तसेच शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या महत्वाकांक्षी प्रकल्पांची माहितीही यावेळी दिली. पिंपरी चिंचवड महापालिका संचालित मोरवाडी व कासारवाडी येथील आयटीआय अभ्यासक्रम, आयटीआय क्षेत्रात होत असलेले नवनवीन बदल, भविष्यात विद्यार्थ्यांना कोणते नवीन ट्रेंड्स व कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे, याबाबत सविस्तर माहिती आयुक्त सिंह यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिली.

# देवेंद्रच्या डोक्यामध्ये शिजतंय काय ? काही जणांचं 'खाली डोकं वर पाय !'

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



'स्टेट'मेंट
राहुल जगताप

### भगवंताचे नाम सोडू नका

संकल्प ही फार मोठी शक्ती आहे. इच्छा जर खरोखर अती प्रबळ झाली, तर ती वस्तूला आपल्याकडे खेचून घेतल्याशिवाय राहणार नाही. तसेच, भगवंताच्या प्राप्तीसाठी प्रबळ इच्छा धारण केली तर भगवंत भेटतो. प्रापंचिक वस्तू आपण कितीही मिळविल्या, तरी त्या स्वभावत:च अपूर्ण असल्यामुळे त्यांच्या प्राप्तीपासून पूर्ण समाधान होत नाही. याच्या उलट, भगवंत स्वत: पूर्ण असल्यामुळे, आपल्या वासनांची पूर्ण तृप्ती होऊन त्या क्षीण बनतात, आणि नंतर आपोआप नाहीशा होतात. म्हणून नेहमी 'भगवंत मला हवा ' अशी इच्छा करीत जावे. त्याचे नाम घेणे, म्हणजे ' तू मला हवास ' असे म्हणणेच होय. खऱ्या प्रेमाने जर आपण आपला भार रामावर टाकला, तर तो नेहमी आपल्या कल्पनेच्या बाहेर गोष्टी घडवून आणतो. आपला देह आणि प्रपंच भगवंताच्या सत्तेने चालतो, ही जाणीव सतत ठेवून जगात वागावे, म्हणजे आपल्याला कधी कमी पडणार नाही. नामात एक विशेष आहे. विषयाकरता जरी नाम घेतले तरी विषय प्राप्त होऊनही ते आपले काम, म्हणजे तुमचे मन निर्विषय करणे, ते करीतच असते. म्हणून कशाकरता का होईना, नाम घ्या. पण निर्विषय होण्याकरता घेतले तर काम शीघ्र होईल. साधन तेच, आणि साध्यही तेच. नामच एक सत्य आहे, यापरते दुसरे सत्य नाही, असा दृढ भाव असावा. आपण कोणचेही कृत्य करीत असताना, ज्याकरता ते आरंभले ते जसे नेहमी आपल्या डोळ्यासमोर असते, त्याप्रमाणे, नाम घेताना, आपण ते कशाकरता घेतो त्याची जाणीव अखंड असावी. ही जाणीव अखंड ठेवणे, मी भगवंताचा आहे हे जाणणे, याचे नाव अनुसंधान. वास्तविक आपण भगवंताचेच आहोत, पण भ्रमाने मला ' मी विषयाचा आहे ' असे वाटू लागले. संत ' तू विषयाचा नाहीस, भगवंताचा आहेस, ' असे सांगतात. हीच संतांची खरी कामगिरी; आणि याकरता ते नाम सांगतात. नाम घेणे म्हणजे ' मी विषयाचा नाही, भगवंताचा आहे ' असे मनाला सांगणे, मनात तशी जाणीव उत्पन्न करणे, आणि ही जाणीव टिकवण्याकरता पुन: पुन: मनाला तेच सांगणे, म्हणजे तेच नाम सतत घेणे. भगवंत खरोखरच मनापासून ज्याला हवा आहे, त्याचे काम झालेच पाहिजे. आपल्याला जगातला मान, लौकिक, पैसा, विषय, इत्यादि काही नको असे वाटते का ? तसे नसेल तर, ' भगवंत मला हवा आहे ' असे नुसते तोंडाने म्हणणे बरोबर नाही. ज्याला भगवंताचे प्रेम जोडायचे असेल त्याने जगाचा नाद सोडायला पाहिजे. जगाच्या मागे लागाल तर आपले साधन बुडवून बसाल. तुम्ही सतत भगवंताचे नाम घ्यावे आणि मनापासून भगवंताला आळवावे, तुम्ही कितीही पतित असला तरी पावन होऊन जाल, हा माझा तुम्हाला आशीर्वाद आहे. बोधवचन:- जो जो संकल्प उठेल तो तो रामस्मरणयुक्त असला पाहिजे.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्ली भेटीवर असून अनेक महत्त्वपूर्ण भेटी घेत आहेत, चर्चा करत आहेत. त्यातील सर्वात मोठी भेट म्हणजे गृहमंत्री अमित शाह यांची! त्यावेळी नक्की काय चर्चा झाली हे गोपनीय ठेवले असले तरी, महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील फेरबदल आणि फेररचना याची चर्चा झाली असणार, हे सांगायला आता कोणा ज्योतिषाची गरज नाही !**

### उधळलेल्या मंत्र्यांना लगाम !

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात गेल्या काही दिवसात अनेक मंत्री उधळले आहेत..बेलगाम, बेछूट, बिनधास्त बोलत आहेत, त्यांना लगाम घालण्याच्या दृष्टीने फडणवीस यांची पावली पडत असून ती वेळ आता आली आहे. म्हणूनच त्यांच्या दिल्लीतील गाठीभेटींना चांगलेच महत्त्व आले आहे. काही मंत्र्यांना हटवण्याशिवाय किंवा काहींचा फेरबदल केल्याशिवाय आता तरणोपाय नाही, हे फडणवीस यांना कळून चुकले आहे !

### चला, दिल्लीचा कानोसा घेऊ या..

महाराष्ट्रात मोठ्या राजकीय घडामोडी घडणार, याचे संकेत मिळत आहेत. आपल्या मंत्रिमंडळातील आठ जणांना फडणवीस थेट घरी पाठवणार, असे काही 'क्ल्यू' देखील मिळत आहेत. 'महायुती' मधील तीन पक्षांपैकी कोणत्या पक्षाला या राजकीय भूकंपाचा सर्वाधिक धक्का बसणार, याबद्दल कमालीची उत्सुकता आहे.

### दिल्ली श्वरांपुढे गाऱ्हाणे मांडले..

देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र सरकार समोरील अडचणींबाबत दिल्लीतील नेत्यांसमोर गाऱ्हाणेच मांडले. काही मंत्र्यांना चाप बसविल्याशिवाय किंवा घरी पाठवल्याशिवाय शिस्त लागणार नाही, ही त्यांनी भूमिका घेतल्यामुळे लवकरच मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे. भारतीय जनता पार्टी, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यावर एक नजर टाकून चर्चा देखील झाली आहे आणि कोणाच्या गटातील वादग्रस्त



मंत्र्यांना हटवण्यात येणार, याची चर्चा जोर धरू लागली आहे.

### राजकीय घडामोडींना वेग..

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात एका कार्यक्रमाला उपस्थिती लावण्यासाठी फडणवीस आणि एकनाथ शिंदे हे दिल्लीला गेले. त्यानंतर मात्र त्यांनी अनेक ज्येष्ठ नेत्यांची चर्चा देखील केली. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात विविध घडामोडी सुरु आहेत, त्याबाबत वरिष्ठांच्या कानावर काही गोष्टी घातल्या गेल्या. याच पार्श्वभूमीवर, फडणवीस हे मंत्रिमंडळात लवकरच मोठे फेरबदल करतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. 'महायुती' सरकारमधील सात ते आठ वादग्रस्त मंत्र्यांना डच्चू मिळणार असल्याचे उघडपणे बोलले जात आहे आणि तसे झालेच तर त्यांच्या ऐवजी काही नव्या चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी दिली जाईल. यात भाजपाचे दोन, शिंदे गटातील चार आणि पवार गटातील दोन मंत्र्यांचा समावेश असल्याची माहिती समोर येत आहे. या सर्वांना मंत्रिमंडळातून बाहेरचा रस्ता दाखवला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे, पाहू या फडणवीस कोणता निर्णय घेतात ते!

### वादग्रस्त वक्तव्य भोवणार

विधानसभा निवडणुकीत 'महायुती' ला मोठे यश मिळाले.. अक्षरशः पाशवी बहुमत मिळाले. यानंतर राज्यात महायुतीचे सरकारही स्थापन झाले. पण, हे सरकार स्थापन झाल्यापासून काही मंत्री आणि काही आमदार सातत्याने वादग्रस्त वक्तव्ये आणि वर्तन करत आहेत. त्यामुळे सरकारची प्रतिमा डागाळली जात आहे. फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमातही काही मंत्र्यांची कामगिरी समाधानकारक नसल्याचे दिसून आले आहे. हीच बाब लक्षात घेता, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी मंत्रिमंडळात मोठे फेरबदल अपेक्षित आहेत. इतर पक्षातील काही दिग्गजांना भाजपामध्ये प्रवेश देऊन त्यांना मंत्रिमंडळात स्थान दिले जाण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. तशी कल्पना देखील पक्षश्रेष्ठींना देण्यात आली आहे.

### कोणत्या पक्षातील किती मंत्री ?

शिवसेनेच्या तीन ते चार मंत्र्यांना संभाव्य फेरबदलात नारळ दिला जाण्याची शक्यता आहे. यामध्ये वादग्रस्त ठरलेले संजय शिरसाट, भरत गोगावले, दादा भुसे आणि योगेश कदम यांचा समावेश असल्याचे बोलले जात आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस मधील धनंजय मुंडे यांचा संतोष देशमुख प्रकरणामुळे आधीच राजीनामा झाला आहे. त्यापाठोपाठ आता सातत्याने वादग्रस्त ठरणाऱ्या माणिकराव कोकाटे यांच्या मंत्रिपदावर टांगती तलवार असल्याची चर्चा आहे. तसेच, नरहरी झिरवळ यांनाही मंत्रिपद गमवावे लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### भाजपाचे नितेश राणे आणि गोरे !

भाजपा कडून मंत्रिमंडळात स्थान मिळालेल्या नितेश राणे आणि जयकुमार गोरे यांच्याकडून सातत्याने वादग्रस्त वर्तन केले जात आहे. त्यामुळे त्यांचेही मंत्रिपद धोक्यात आले आहे, असे काही सूत्रांनी सांगितले. गिरीश महाजन यांनाही पक्षाच्या गरजेनुसार मंत्रिमंडळाबाहेर राहण्यास सांगितले जाऊ शकते. पण तो शेवटचा निर्णय असेल किंवा नसेलही!

### राहुल नार्वेकर यांना मंत्रीपद?

या फेरबदलात सर्वात सणसणाची निर्णय होण्याची शक्यता आहे तो म्हणजे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची मंत्रिपदावर वर्णी! त्यांच्या जागी भाजपामध्ये सध्या नाराज असलेल्या सुधीर मुनगंटीवार यांची विधानसभा अध्यक्षपदी वर्णी लागण्याची चर्चा चांगलीच रंगली आहे. मात्र, या संभाव्य फेरबदलांमुळे 'महायुती' मध्ये समाधान होण्याऐवजी असमाधानाचा स्फोट होण्याची जास्त शक्यता आहे. मंत्रीपदाच्या बंधनात तोंडावर काहीतरी लगाम होता, ते बंधनच जर हटवले तर अनेकांच्या तोंडाचा दांडपट्टा सुटण्याची शक्यता आहे, हे मात्र नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंडेंची पुन्हा मंत्रिमंडळात वर्णी लागणार?

## क्लीन चिट मिळाली तर त्यांना पुन्हा मंत्रिपदाची संधी



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी काही महिन्यांपूर्वी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडवर गंभीर आरोप झाले होते. मात्र, वाल्मीक कराड हे धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असल्याची टीका विरोधकांनी केली होती. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता.**

दरम्यान, आता धनंजय मुंडे यांचा मंत्रिमंडळात पुन्हा समावेश होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. कारण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या मंत्रिमंडळातील समावेशाबाबतचे संकेत आज माध्यमांशी बोलताना दिले आहेत. धनंजय मुंडे यांच्यावर कृषी विभागासंदर्भातील काही आरोप झाले होते. मात्र, यामधून न्यायालयाने त्यांना क्लीन चिट दिली आहे, आता दुसऱ्या प्रकरणातून जर त्यांना क्लीन चिट मिळाली तर त्यांना पुन्हा मंत्रिपदाची संधी देऊ असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. धनंजय मुंडेंबाबत तुम्ही बातम्या वाचल्या असतील. त्यांच्यावर कृषीविभागाशी संबंधित जे आरोप झाले त्या आरोपाबाबत न्यायालयाने धनंजय मुंडे यांना क्लिन चीट दिली. त्यामध्ये त्यांचा कुठेही दोष नाही. आता अजून एक गोष्ट आहे. त्याबाबतही पोलीस यंत्रणा त्याबाबत योग्य ती कारवाई करत आहेत. या प्रकरणामधून जर त्यांना क्लिन चीट मिळाली तर आम्ही धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रिपदाची संधी देऊ”, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. छगन भुजबळ यांना धनंजय मुंडेंच्या पुन्हा मंत्रिमंडळातील समावेशाबाबत प्रश्न विचारला. त्यावर भुजबळ म्हणाले की, “धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्रिमंडळात घेण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे योग्य तो निर्णय घेतील”, असं छगन भुजबळ हे आज माध्यमांशी बोलताना म्हणाले होते. माणिकराव कोकाटे यांच्याबाबत बोलताना अजित पवार म्हणाले की, “मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्ली दौऱ्यावर आहेत. ते उद्या (शनिवारी) येतील, पण मी उद्या पुणे आणि परवा नगरच्या दौऱ्यावर आहे. मी सोमवारी मुंबईत गेल्यानंतर याबद्दलची बाकीची चर्चा आम्हाला करायची आहे. मंत्री माणिकराव कोकांटे यांच्याबरोबर देखील चर्चा करायची आहे. बाकींच्याही काहींशी चर्चा करायची आहे. या चर्चा करून मी मंगळवारपर्यंत निर्णय घेईल”, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. दरम्यान, मंगळवारी मंत्रिमंडळाची बैठक आहे, त्या बैठकीनंतर निर्णय होणार की आधी? असा प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले की, “याबाबत आम्ही त्या ठिकाणी गेल्यानंतर ते ठरवणार आहोत.”दरम्यान, आता धनंजय मुंडे यांचा मंत्रिमंडळात पुन्हा समावेश होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. कारण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या मंत्रिमंडळातील समावेशाबाबतचे संकेत आज माध्यमांशी बोलताना दिले आहेत. धनंजय मुंडे यांच्यावर कृषी विभागासंदर्भातील काही आरोप झाले होते. मात्र, यामधून न्यायालयाने त्यांना क्लीन चिट दिली आहे, आता दुसऱ्या प्रकरणातून जर त्यांना क्लीन चिट मिळाली.

### धनंजय मुंडे यांना क्लिन चीट

त्यांना पुन्हा मंत्रिपदाची संधी देऊ असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.धनंजय मुंडेंबाबत तुम्ही बातम्या वाचल्या असतील. त्यांच्यावर कृषीविभागाशी संबंधित जे आरोप झाले त्या आरोपाबाबत न्यायालयाने धनंजय मुंडे यांना क्लिन चीट दिली. त्यामध्ये त्यांचा कुठेही दोष नाही. आता अजून एक गोष्ट आहे. त्याबाबतही पोलीस यंत्रणा त्याबाबत योग्य ती कारवाई करत आहेत. या प्रकरणामधून जर त्यांना क्लिन चीट मिळाली तर आम्ही धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रिपदाची संधी देऊ”, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.छगन भुजबळ यांना धनंजय मुंडेंच्या पुन्हा मंत्रिमंडळातील समावेशाबाबत प्रश्न विचारला. त्यावर भुजबळ म्हणाले की, “धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्रिमंडळात घेण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे योग्य तो निर्णय घेतील.

# हर्षल पाटीलनंतर हा देखील खूनच

## केजमध्ये आंदोलनकर्त्याच्या मृत्यूनंतर आव्हाडांची प्रतिक्रिया



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**गेल्या काही महिन्यात मराठवाड्यातील बीड जिल्हा वेगवेगळ्या कारणांमुळे सतत चर्चेत राहिला आहे. बीड जिल्ह्यात वाढलेल्या गुन्हेगारीच्या मुद्द्यावर विरोधकांकडून सत्ताधारी पक्षांवर सातत्याने टीका केली जात आहे. यादरम्यान आता पुन्हा एकाद बीडच्या केज येथून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. केज तहसील कार्यालयाच्या समोर उपोषण करणाऱ्या एका महिलेचा मृत्यू झाल्याची बाब समोर आली आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एका पोस्ट करत याबद्दल माहिती दिली आहे. यावेळी आव्हाड यांनी उपोषण करताना शेतकऱ्याचा जीव जाणे हे कृषिप्रधान देशाला काळिमा फासणारी घटना आहे असे म्हटले आहे. आमदार जितेंद्र आव्हाडांनी केलेल्या पोस्टनुसार ही महिला आवादा कंपनीच्या मनमानी कारभाराच्या विरोधात केज तहसीलसमोर अमरण उपोषण करत होती.

महिलेने स्थानिक प्रशासनाकडे दाद मागितली पण त्यांनी हे प्रकरण आमच्या अखत्यारीत येत नाही असं तिला कळवलं असे आव्हाड म्हणाले आहेत. तसेच त्यांनी कंत्राटदार हर्षल पाटील याच्यानंतर हा देखील राजकीय खूनच असल्याचे म्हचले आहे. आव्हाडांनी आंदोलन स्थळावर मृतदेहाच्या जवळ आक्रोश करणाऱ्या महिलांचा एक व्हिडीओ देखील यावेळी पोस्ट केला आहे.आमदार आव्हाडांनी केलेल्या पोस्टमध्ये ते म्हणाले आहेत की, ही अत्यंत गंभीर आणि दुःखद घटना आहे. कंत्राटदार हर्षल पाटील नंतर हा देखील राजकीय खूनच आहे. सदर महिलेच्या शेतातून अवादा कंपनीने विजेच्या वायर ओढून नेल्या होत्या.

### हर्षल पाटील प्रकरण काय आहे?

त्याविरोधात सदरील महिला उपोषण करत होती. मयत महिलेने स्थानिक प्रशासनाकडे दाद मागितली. पण “आमच्या अखत्यारीत हे प्रकरण येत नाही”, असे पत्र तहसीलदाराने सदरील महिलेस दिले. अशी प्राथमिक माहिती आहे. अखेर शेवटचा उपाय म्हणून ही महिला उपोषणाला बसली असताना तिचा जीव गेला. आत्महत्या करत आधी शेतकरी आपला जीव देतच होते...पण आता उपोषण करताना देखील त्याचे जीव जाताहेत. कृषिप्रधान देशाला ही काळिमा फासणारी घटना आहे.”जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या नळपाणी योजनेचे कंत्राटदार सांगली जिल्ह्यातील हर्षल पाटील (वय ३५, रा. तांदूळवाडी, ता. वाळवा) यांनी शेतात गळफास घेऊन मंगळवारी आत्महत्या केली. शासनाकडे सुमारे दीड कोटीचे देयक थकीत असल्याने निर्माण झालेल्या आर्थिक विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केल्याचा दावा केला दात आहे.


# मालदीव मित्र असल्याचा अभिमान!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे प्रतिपादन, समारंभपूर्वक स्वागत

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**'मालदीवसारखा विश्वासार्ह देश मित्र असल्याचा अभिमान आहे,' असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी काढले. तसेच, मालदीवसाठी ४८५० कोटी रुपयांच्या 'लाइन ऑफ क्रेडिट'ची घोषणा केली. मालदीवचे अध्यक्ष महंमद मुईझ्झू यांच्याबरोबर सविस्तर चर्चा केल्यानंतर मोदींनी ही घोषणा केली. शिष्टमंडळ स्तरावरील चर्चेपूर्वी उभय नेत्यांमध्येच फक्त चर्चा झाली. व्यापार, संरक्षण आणि पायाभूत क्षेत्रात अधिक सहकार्यावर या वेळी लक्ष देण्यात आले.**

पंतप्रधान मोदी यांच्या मालदीव भेटीने दोन्ही देशांतील गेल्या काळात ताणलेले संबंध दूर होण्यामध्ये मदत होणार आहे. दोन्ही देश द्विस्तरावरील गुंतवणूक करारासाठी काम करतील, अशी अपेक्षाही मोदी यांनी व्यक्त केली. मुक्त व्यापार करारासाठी चर्चा सुरू झाल्याचेही ते म्हणाले.दरम्यान, मोदी यांचे माले येथे शुक्रवारी सकाळी आगमन झाले.मालदीवचे अध्यक्ष मुईझ्झू आणि इतर वरिष्ठ नेते मोदींच्या आगमनावेळी उपस्थित होते. मोदी यांना ऐतिहासिक रिपब्लिक स्क्वेअर येथे समारंभपूर्वक मानवंदना देण्यात आली. 'मुईझ्झू स्वत: माझ्या स्वागतासाठी विमानतळावर आले. त्यांच्या अशा येण्याने मी कृतज्ञ आहे.येत्या काळात भारत-मालदीव मैत्री नवी उंची गाठेल, याची मला खात्री आहे,' असे मोदी म्हणाले. पंतप्रधान मोदी २६ जुलै रोजी प्रमुख अतिथी म्हणून मालदीवच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहतील. भारताच्या सहाय्याने करण्यात येत असलेल्या विकासकामांचे उद्घाटन मोदींच्या हस्ते होणार आहे.भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' आणि 'महासागर' (म्युच्युअल अँड होलिस्टिक अॅडव्हान्समेंट फॉर सिक्युरिटी अँड ग्रोथ अॅक्रॉस रीजन्स) धोरणात मालदीवचे स्थान महत्त्वाचे आहे. भारताने मालदीवला ५६.५ कोटी डॉलर (४८५० कोटी रुपये) 'लाइन ऑफ क्रेडिट' देण्याचा निर्णय घेतला आहे. संरक्षण आणि सुरक्षेमध्ये परस्परसहकार्य हा आपल्यातील विश्वास दाखवतो. मालदीवची संरक्षण क्षमता अधिक मजबूत करण्यासाठी भारताचा नेहमीच पाठिंबा राहील.भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या परदेश दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात २४ जुलै रोजी पंतप्रधान मोदी यांनी ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांची भेट घेत भारत आणि ब्रिटनमध्ये ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या करारामुळे जवळपास ३४ अब्ज डॉलर्सने व्यापार वाढण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, ब्रिटननंतर आता पंतप्रधान मोदी हे मालदीवच्या दौऱ्यावर आहेत.



पंतप्रधान मोदी हे शुक्रवारी मालदीवमध्ये पोहोचले आहेत. यावेळी भारत आणि मालदीवमधील राजनैतिक संबंधांचं त्यांनी कौतुक केलं आहे.

तसेच मालदीवला तब्बल ५६५ दशलक्ष डॉलर्स कर्ज देण्याची घोषणा देखील पंतप्रधान मोदींनी केली आहे. यावेळी मोदींनी मालदीव भारताचा फक्त शेजारी नाही तर सहप्रवासी असल्याचं म्हटलं आहे. तसेच मालदीव हा भारताचा सर्वात विश्वासू मित्र असून भारतही प्रत्येक संकटात 'फर्स्ट रेस्पोंडर' म्हणून उभा राहिल्याचंही मोदी म्हणाले आहेत.भारताला मालदीवचा सर्वात विश्वासू मित्र असल्याचा अभिमान आहे. आपत्ती असो किंवा कोवीडची साथ असो, भारत नेहमीच फर्स्ट रेस्पोंडर म्हणून पाठीशी उभा राहिला आहे. मग जीवनावश्यक वस्तू पुरवण्याचा विषय असो किंवा कोविडनंतर अर्थव्यवस्था हाताळण्याचा, भारताने नेहमीच एकत्र काम केलं आहे. भारतासाठी मैत्री नेहमीच प्रथम असते. भारत मालदीवच्या संरक्षण क्षमता मजबूत करण्यासाठी नेहमीच पाठिंबा देईल. संरक्षण आणि सुरक्षा क्षेत्रातील सहकार्य हे परस्पर विश्वासाचे प्रतीक आहे", असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी या दौऱ्याच्या दरम्यान मालदीवसाठी तब्बल ५६५ दशलक्ष डॉलर्स लाइन ऑफ क्रेडिट देण्याची घोषणा केली. तसेच पंतप्रधान मोदी यांनी भारत आणि मालदीवमध्ये मुक्त व्यापार करारावरही चर्चा केली.

### पंतप्रधान मोदी मालदीवमध्ये पोहोचले

यावेळी मोदी म्हणाले की, "विकासाच्या भागीदारीच्या पार्श्वभूमीवर आम्ही मालदीवसाठी ५६५ दशलक्ष डॉलर्स देण्याचा निर्णय घेतला आहे. मालदीवच्या लोकांच्या प्राधान्यांनुसार येथील पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित प्रकल्पांसाठी ही मदत वापरली जाईल", असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं.पंतप्रधान मोदी यांनी मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. तसेच व्यापार, संरक्षण आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात सहकार्य मजबूत करण्यावर भर दिला. दरम्यान, आज (२५ जुलै) सकाळी पंतप्रधान मोदी मालदीवमध्ये पोहोचले, तेव्हा त्यांचं जोरदार स्वागत करण्यात आलं. त्यांच्या स्वागतासाठी मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइज्जू हे देखील उपस्थित होते.'मालदीवसारखा विश्वासार्ह देश मित्र असल्याचा अभिमान आहे.

---

# राजस्थानमध्ये शाळेची इमारत कोसळली

## सात विद्यार्थ्यांचा मृत्यू, 28 जण जखमी 35 विद्यार्थी ढिगाऱ्याखाली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राजस्थानमधील झालावाड जिल्ह्यात एका सरकारी शाळेच्या इमारतीचा काही भाग शुक्रवारी सकाळी कोसळला. सकाळच्या प्रार्थनेसाठी सर्व विद्यार्थी एकत्र येत असतानाच ही दुर्घटना घडली. त्यात सात विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर २८ जण जखमी झाले. पिपलोडी गावात असलेल्या या सरकारी शाळेच्या इमारतीचा भाग कोसळल्यानंतर सहावी व सातवीमध्ये शिकत असलेले ३५ विद्यार्थी ढिगाऱ्याखाली अडकले.**



काँक्रीट, विटा आणि दगडांचे ढिगारे हटवण्यासाठी अग्निशामक दलाला आणि बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. पालक, शिक्षकांसह बचाव पथकातील कर्मचाऱ्यांनी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मुलांना बाहेर काढण्यात मदत केली. सात विद्यार्थ्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून जखमी मुलांना झालावाड रुग्णालय आणि मनोहरथाना आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. जखमींपैकी नऊ जणांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आल्याची माहिती देण्यात आली.राजस्थानातील दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला. "झालावाड येथे शाळेच्या इमारतीचा भाग कोसळल्याची घटना दु:खद आहे. शोकाकुल कुटुंबांना दु:ख सहन करण्याची शक्ती मिळावी आणि जखमी विद्यार्थ्यांची प्रकृती लवकर सुधारावी, अशी मी प्रार्थना करते," असे मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे. या कठीण काळात माझ्या भावना पीडित विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांबरोबर आहेत. अधिकारी पीडितांना सर्वतोपरी मदत करत आहेत, असे पंतप्रधानांनी सांगितले. या शाळेची इमारती धोकादायक होती. शाळेच्या इमारतीच्या स्थितीबद्दल स्थानिक ग्रामस्थांनी आणि पालकांनी तहसीलदार आणि उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना माहिती दिली होती. परंतु कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

### प्रशासनावर निष्काळजीचा आरोप

प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडली, असा आरोप स्थानिकांनी केला.राजस्थानमधील झालावाड जिल्ह्यात एका सरकारी शाळेच्या इमारतीचा काही भाग शुक्रवारी सकाळी कोसळला. सकाळच्या प्रार्थनेसाठी सर्व विद्यार्थी एकत्र येत असतानाच ही दुर्घटना घडली. त्यात सात विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर २८ जण जखमी झाले. पिपलोडी गावात असलेल्या या सरकारी शाळेच्या इमारतीचा भाग कोसळल्यानंतर सहावी व सातवीमध्ये शिकत असलेले ३५ विद्यार्थी ढिगाऱ्याखाली अडकले. काँक्रीट, विटा आणि दगडांचे ढिगारे हटवण्यासाठी अग्निशामक दलाला आणि बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. पालक, शिक्षकांसह बचाव पथकातील कर्मचाऱ्यांनी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मुलांना बाहेर काढण्यात मदत केली. सात विद्यार्थ्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

# झी मराठी'वर 11 ऑगस्टपासून होणार बदल




सध्या प्रत्येक वाहिनी टीआरपीच्या शर्यतीत अग्रेसर राहण्यासाठी नवनवीन प्रयत्न करत असल्याचं पाहायला मिळत आहे. येत्या ११ ऑगस्टला 'झी मराठी' वाहिनीवर दोन नव्या मालिका सुरू होणार आहेत. यापैकी 'वीण दोघांतली ही तुटेना' या मालिकेत अभिनेत्री तेजश्री प्रधान मुख्य भूमिका साकारत आहे. तर, 'तारिणी' मालिकेत शिवानी सोनार प्रमुख भूमिकेत झळकणार आहे. 'वीण दोघांतली ही तुटेना' ही मालिका ११ ऑगस्टपासून संध्याकाळी ७:३० वाजता प्रसारित केली जाणार आहे. त्यामुळे काही जुन्या मालिकांच्या वेळा बदलण्यात आल्या आहेत. ११ ऑगस्टपासून वाहिनीवरील एकूण ३ मालिकांच्या वेळेत बदल केला जाईल.सध्या साडेसात वाजता 'पारू' ही मालिका प्रसारित केली जाते. आता ही मालिका अर्धा तास आधी म्हणजेच ७ वाजता प्रसारित केली जाईल. तर, ७ वाजताची 'सावळ्याची जणू सावली' ही मालिका आता ६:३० वाजता ऑन एअर होईल. याशिवाय 'लाखात एक आमचा दादा' या मालिकेची वेळ बदलून सायंकाळी ६ वाजता ही करण्यात आली आहे.याशिवाय शिवानी सोनारची 'तारिणी' मालिका ९:३० वाजता प्रसारित केली जाईल. या स्लॉटला सध्या सुरू असलेली 'शिवा' मालिका लवकरच प्रेक्षकांचा निरोप घेण्याची दाट शक्यता आहे. शिवानी सोनारच्या 'तारिणी' मालिकेत तिच्यासह अभिज्ञा भावे, स्वराज नागरगोजे, सुवेधा देसाई, आरती वडगबाळकर, नियती राजवाडे, रुपाली मांगले ज्येष्ठ अभिनेत्री रागिणी सामंत असे बरेच कलाकार झळकणार आहेत.सध्या प्रत्येक वाहिनी टीआरपीच्या शर्यतीत अग्रेसर राहण्यासाठी नवनवीन प्रयत्न करत असल्याचं पाहायला मिळत आहे. यापैकी 'वीण दोघांतली ही तुटेना' या मालिकेत अभिनेत्री तेजश्री प्रधान मुख्य भूमिका साकारत आहे. तर, 'तारिणी' मालिकेत शिवानी सोनार प्रमुख भूमिकेत झळकणार आहे. 'वीण दोघांतली ही तुटेना' ही मालिका ११ ऑगस्टपासून संध्याकाळी ७:३० वाजता प्रसारित केली जाणार आहे.

# 50 कोटींचे बजेट, 2 कोटी कमवू शकला नाही!

अभिनेते अनुपम खेर यांनी दिग्दर्शित केलेला दुसरा सिनेमा 'तन्वी द ग्रेट' १८ जुलै रोजी रिलीज झाला. टीमने या चित्रपटाचे जोरदार प्रमोशन केले. अनुपम खेर यांनी त्यांचे ऑस्कर विजेते मित्र रॉबर्ट डी नीरो यांना न्यू यॉर्कमध्ये चित्रपटाच्या प्रीमियरला बोलावलं. 'तन्वी द ग्रेट' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर 'सैयारा'बरोबर रिलीज झाला. पण तो पाच दिवसांत २ कोटीही कमवू शकला नाही. 'तन्वी द ग्रेट' चित्रपटाच्या निर्मितीसाठी ५० कोटी रुपये खर्च आला होता, असं अनुपम खेर यांनी स्वतः कबूल केलंय. हे पैसे अनुपम यांनी मित्र आणि ओळखीच्या लोकांच्या मदतीने गोळा केले होते.रिपब्लिकला दिलेल्या मुलाखतीत अनुपम खेर म्हणाले की ज्याने या चित्रपटाच्या निर्मितीसाठी पैसे देण्याची तयारी दर्शवली होती, त्याने शूटिंगच्या काही आठवड्यांआधी काढता पाय घेतला. त्यामुळे अनुपम यांनी ओळखीच्या लोकांकडून पैसे



घेऊन चित्रपट पूर्ण करायचं ठरवलं. या चित्रपटाचे १० निर्माते आहेत, यापैकी काही डॉक्टर व व्यावसायिक आहेत. या चित्रपटाचे बजेट ५० कोटी असून त्यासाठी कोणत्याही कलाकाराने पैसे घेतलेले नाहीत.तन्वी द ग्रेटने फार चांगले कलेक्शन केलेले नाही. दुर्दैवाने, गेल्या १० वर्षांत जे घडलंय, त्यानुसार चित्रपट कसा आहे हे त्याच्या कलेक्शनवरून ठरतं. जर एखाद्या चित्रपटाने चांगले कलेक्शन केले नाही, तर तो चांगला चित्रपट नाही, असं लोकांना वाटतं. मी या सिनेमाची बाजू घेत नाहीये, कारण मीही याच इंडस्ट्रीचा एक भाग आहे," असं अनुपम खेर म्हणाले."जेव्हा आम्ही या सिनेमाचं बजेट ठरवलं तेव्हा ते तब्बल ५० कोटी रुपयांवर पोहोचलं. एक गृहस्थ होते, त्यांनी आम्हाला बजेटच्या ५०% रक्कम देणार असं म्हटलं, ती खूप मोठी रक्कम होती. सगळं ठरलं, पण शूटिंगच्या एक महिना आधी मला सांगण्यात आलं की ते चित्रपटासाठी पैसे देऊ शकत नाहीत," असं अनुपम खेर म्हणाले. अचानक ते मागे हटल्याने अनुपम खेर यांनी मित्रांची मदत घ्यायचं ठरवलं. "मी अमेरिकेत आणि भारतातील माझ्या काही मित्रांना फोन केले.

या चित्रपटाचे १० सह-निर्माते आहेत. हा चित्रपट मुळात लोकांकडून पैसे गोळा करून तयार करण्यात आलाय. मी त्यांना चित्रपटाचा सारांश पाठवला होता. या सर्वांपैकी कोणाचाही चित्रपटांशी संबंध नाही. काही जण व्यावसायिक आहेत, काही डॉक्टर आहेत तर कोणी बँकेत काम करतंय. मी त्यांना म्हटलं होतं की चित्रपट प्रदर्शित झाल्यावर मी पैसे परत करेन, पण त्यापैकी कोणीही अद्याप पैसे मागितलेले नाही.

# आमच्यातलं भांडण संपलं

आजपर्यंत अभिनेत्री मुक्ता बर्वे हिने वेगवेगळ्या मालिका, नाटक आणि चित्रपटांमधून प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले. या तिन्ही माध्यमांमध्ये मुक्ताला प्रेक्षकांची पसंती मिळाली. मुक्ता बर्वेचा चाहता वर्ग खूप मोठा आहे. वेगवेगळ्या गोष्टी तिच्याबद्दल जाणून घेण्यासाठी तिचे चाहते नेहमीच उत्सुक असतात. स्वतःच्या हिमतीवर मुक्ताने मराठी सिनेसृष्टीत स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे.मुक्ता बर्वे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. मुक्ता बर्वेने तिच्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या अनुभवातून सकारात्मक संदेश दिलाय. मुक्ता स्वतःच्या मूळ स्वरूपाचा स्वीकार करणे किती गरजेचे आहे, यावर बोलली आहे.मुक्ता बर्वेच्या या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये तिने तिचे दोन फोटो शेअर केले आहेत. या पोस्टमध्ये तिने एक कुरळे केसांचा आणि एक सरळ केसांचे फोटो शेअर केले आहेत. तिने या पोस्टला कॅप्शनदेखील दिलं आहे. तिने लिहिले, "एक गंमत सांगते, मला कित्ती तरी वर्ष हे माहीतच नव्हतं की माझे केस कुरळे आहेत. मला वाटायचं माझे केस फार हट्टी, त्रासदायक आणि वाईट आहेत, जे कधीच मला हवे तसे, सगळ्यांचे असतात तसे दिसत नाहीत; त्यामुळे मी त्यांना प्रयत्न करून सरळ करायचे आणि ते कुरळे होऊन होऊन मला त्रास द्यायचे.

# मनोज मुंतशिरचं दु:खच वेगळं!

प्रसिद्ध गीतकार आणि पटकथा लेखक मनोज मुंतशिर हा गेल्या काही दिवसांपासून पुन्हा चर्चेत आला आहे. मनोज मुंतशिर हा त्याच्या उत्कृष्ट लेखनासाठी ओळखला जायचा मात्र आदिपुरूष या चित्रपटामुळे त्याला टिकेचा सामना करावा लागला. आदिपुरुष चित्रपटातील अनेक संवादांमुळे बराच वाद झाला. वाढता वाद पाहून लेखक आणि निर्मात्यांनी चित्रपटातील संवाद बदलण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर बऱ्याच महिन्यांनंतर त्याने आपली चुक मान्य केली आणि दुसरी संधी मिळायला हवी असे सांगितले. आता अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान मनोज मुंतशिरने जावेद अख्तर यांचे कौतुक केले.



# 'वॉर 2' सिनेमाचा जबरदस्त ट्रेलर रिलीज

२०२५ च्या बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक असलेल्या 'वॉर २'ची लोक आतुरतेने वाट पाहत होते आणि आता निर्मात्यांनी त्यांचा आनंद द्विगुणीत केला आहे. कारण- आज २५ जुलै रोजी त्यांनी हृतिक रोशन आणि ज्युनियर एनटीआर स्टारर चित्रपटाचा ट्रेलर रिलीज केला आहे. या ट्रेलरमध्ये दोन्ही स्टार्समध्ये जबरदस्त टक्कर दिसून येते. त्याच वेळी त्यांच्याबरोबर चित्रपटात अभिनेत्री कियारा अडवाणीही दिसत आहे, जी पहिल्यांदाच जबरदस्त ॲक्शन अवतारात दिसणार आहे.हा दोन मिनिटे ३५ सेकंदांचा ट्रेलर हृतिक रोशनच्या कबीर या व्यक्तिरेखेने सुरू होतो. त्याच वेळी ट्रेलरच्या मध्यभागी कियारा अडवाणी आणि हृतिक रोशन यांच्यात रोमँटिक केमिस्ट्रीदेखील दिसून येईल. कियाराने चित्रपटात एका लष्करी अधिकाऱ्याची भूमिका साकारली आहे.'वॉर २'च्या ट्रेलरमध्ये हृतिक आणि ज्युनियर एनटीआरसह चित्रपटातील संपूर्ण कलाकारांची झलक दाखवण्यात आली आहे. त्यामध्ये चित्रपटाची मुख्य अभिनेत्री कियारा अडवाणीदेखील आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर आता चित्रपटाबद्दल लोकांचा उत्साह आणखी वाढला आहे. तसेच संपूर्ण स्टारकास्ट प्रेक्षकांचं भन्नाट मनोरंजन करणार आहे.'वॉर २'च्या ट्रेलरमध्ये जबरदस्त ॲक्शन आहे. अनेक दृश्यांमध्ये हृतिक रोशन आणि ज्युनियर एनटीआर समोरासमोर दिसत आहेत. अशा परिस्थितीत हे स्पष्ट आहे की हा चित्रपट ॲक्शननी पूर्णत: भरलेला असणार आहे. या सर्व बाबींव्यतिरिक्त आशुतोष राणादेखील चित्रपटाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

# ‘मिस्टर 360’ इंग्लंडमध्ये गरजला!

## एबी डिविलियर्सने इंग्लंडविरुद्ध शतकी खेळी केली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिकेचा स्टार फलंदाज एबी डिविलियर्स हा आपल्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो. त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केला आहे. मात्र, त्याच्या फलंदाजीतील आक्रमकता अजूनही कमी झालेली नाही. सध्या तो वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्स स्पर्धेत दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाचं नेतृत्व करत आहे. या संघाकडून फलंदाजी करताना त्याने इंग्लंड चॅम्पियन्सकडून खेळताना दमदार शतकी खेळी केली आहे. त्याने इंग्लंड चॅम्पियन्स संघातील गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. यासह आपल्या संघाला सलग तिसरा विजय मिळवून दिला.**



या सामन्यात दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या इंग्लंड चॅम्पियन्स संघाने २० षटकांअखेर ६ गडी बाद १५२ धावा केल्या. त्यामुळे दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी १५३ धावा करायच्या होत्या. हे आव्हान दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाने १२.२ षटकात पूर्ण केले. यासह हा सामना १० गडी राखून आपल्या नावावर केला. सलग ३ सामने जिंकून दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघ ६ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला आहे. या सामन्यात धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाकडून एबी डिविलियर्सने दमदार शतक झळकावलं. त्याने २० चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. तर ४१ चेंडूंचा सामना करत आपलं शतक पूर्ण केलं. या खेळीदरम्यान त्याने ७ षटकार आणि १५ चौकार मारले. या डावात त्याने ११६ धावांची खेळी केली. दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाकडून हाशिम आम्ला आणि एबी डिविलियर्सची जोडी डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानावर आली होती. दोघांनी मिळून दिलेलं आव्हान पूर्ण केलं. आम्लाने २५ चेंडूंचा सामना करत ४ चौकारांच्या साहाय्याने २९ धावांची खेळी केली.इंग्लंडचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. इंग्लंड चॅम्पियन्स संघाकडून ओएन मॉर्गनने २० धावांची खेळी केली. इंग्लंडकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या मस्टर्सने ३९ धावांची खेळी केली. तर रवी बोपाराने ७, मोईन अलीने १०, समित पटेलने २४ धावांची खेळी केली. दक्षिण आफ्रिकेकडून गोलंदाजी करताना पार्नेल आणि इमरान ताहीरने प्रत्येकी २-२ गडी बाद केले.या सामन्यात दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या इंग्लंड चॅम्पियन्स संघाने २० षटकांअखेर ६ गडी बाद १५२ धावा केल्या. त्यामुळे दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी १५३ धावा करायच्या होत्या. हे आव्हान दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाने १२.२ षटकात पूर्ण केले. यासह हा सामना १० गडी राखून आपल्या नावावर केला. सलग ३ सामने जिंकून दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघ ६ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला आहे. या सामन्यात धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाकडून एबी डिविलियर्सने दमदार शतक झळकावलं. त्याने २० चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं.

### आफ्रिका गुणतालिकेत अव्वल स्थानी


या डावात त्याने ११६ धावांची खेळी केली. दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाकडून हाशिम आम्ला आणि एबी डिविलियर्सची जोडी डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानावर आली होती. दोघांनी मिळून दिलेलं आव्हान पूर्ण केलं. आम्लाने २५ चेंडूंचा सामना करत ४ चौकारांच्या साहाय्याने २९ धावांची खेळी केली.इंग्लंडचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. इंग्लंड चॅम्पियन्स संघाकडून ओएन मॉर्गनने २० धावांची खेळी केली. इंग्लंडकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या मस्टर्सने ३९ धावांची खेळी केली. तर रवी बोपाराने ७, मोईन अलीने १०, समित पटेलने २४ धावांची खेळी केली. दक्षिण आफ्रिकेकडून गोलंदाजी करताना पार्नेल आणि इमरान ताहीरने प्रत्येकी २-२ गडी बाद केले.दक्षिण आफ्रिकेचा स्टार फलंदाज एबी डिविलियर्स हा आपल्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो. त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केला आहे. मात्र, त्याच्या फलंदाजीतील आक्रमकता अजूनही कमी झालेली नाही.

# रेसलिंग स्टार हल्क होगन यांचं निधन

## कुस्तीला जगभरात ग्लॅमर मिळवून देणारा पैलवान हरपला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगप्रसिद्ध रेसलिंग स्टार टेरी बोलिया ज्यांना संपूर्ण जग 'हल्क होगन' या नावाने ओळखतं, याच हल्क होगन यांचं वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झालं. कार्डिॲक अरेस्टमुळे होगन यांची प्राणज्योत मालवली. गुरुवारी सकाळी त्यांच्यावर अचानक वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती ओढावली, ज्यानंतर होगन यांना रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र उपचारां दरम्यान होगन यांचा मृत्यू झाला.**



होगन यांना स्ट्रेचरवरून त्यांच्या घरातून जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं, मात्र तिथे त्यांची प्राणज्योत मालवली.१९९० च्या दशकात हल्क होगन हे नाव केवळ WWE साठी मर्यादित नव्हतं, तर ते एक 'पॉप कल्चर आयकॉन' बनलं होतं. त्यांच्या दमदार शरीरयष्टी खास व्यक्तिमत्त्व यामुळे ते प्रत्येक घरात ओळखले जात होते. केवळ WWE च नाही, तर त्यांनी काही हॉलिवूड चित्रपटांतही अभिनय करून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली होती. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे.

### WWE ने वाहिली श्रद्धांजली

९० च्या दशकात अनेकांच्या बालपणीचा हिरो अशी ओळख असलेले हल्क होगन यांनी तो काळ खरोखर गाजवला होता. WWE हे तेव्हा जगभरात पाहिलं जात होतं. हल्क होगन यांची स्टिकर्सही मिळाली होती आणि त्यांचे चाहते जगभरात होते. याच हल्क होगन यांचा आज कार्डिॲक अरेस्टमुळे मृत्यू झाला. त्यांना स्ट्रेचरवरुन रुग्णालयात नेण्यात आलं पण त्याची प्राणज्योत मालवली. मे महिन्यात हल्क हॉगनवर मानेची शस्त्रक्रिया झाली होती. यूएस वीकलीच्या वृत्तानुसार गेल्या महिन्यात त्याच्यावर गंभीर हृदयशस्त्रक्रियाही झाली होती. WWE कडून हल्क होगन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. होगन यांच्यामुळे १९८० आणि १९९० च्या दशकात WWE ला जगभरात ओळख मिळाली. आम्ही होगन यांच्या कुटुंबाच्या दुःखात आणि चाहत्यांच्या दुःखात सहभागी आहोत अशी पोस्ट WWE ने केली आहे.हल्क होगन हे फक्त पैलवान नव्हते तर तरुणांसाठी लहान मुलांसाठी ते त्या काळात आयकॉनच ठरले होते.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

। शनिवार ।
। दि. 26जुलै 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

**DYP**
Dr. D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

**D Y PATIL COLLEGE OF ENGINEERING AKURDI, PUNE**
(An Autonomous Institute)


**Institute Code - 06272**

# ADMISSIONS OPEN

## 2025-26

## M-Tech
## Computer Engineering

## Intake: 26




**Program Highlights :**

- 100% placement assistance
- Additional Teaching assistance for GATE qualified students.
- Scholarship will be provided as per the AICTE norms.
- Open for Streams: Computer Engineering, Computer Science and Engineering Information Technology, Artificial Intelligence and Data Science and Electronics and Telecommunication.

**Future Scope In Computer Engineering**

- Data Scientist
- Game developer
- Network Architect
- Network Engineer
- Computer Hardware Engineer
- Artificial Intelligence and Data Science Engineer

**Dr Dipalee D Rane**
PG Coordinator : contact : +91 9763701528

**HOD : Dr M.A Potey**
Email id : hod_comp@dypcoeakurdi.ac.in

+91-20-27653054/58 | info@dypcoeakurdi.ac.in | dypcoeakurdi.ac.in | @dypakurdipune



# अन् विद्यार्थ्यांमध्ये जागली राष्ट्रभक्तीची स्फूर्ती!

## शिक्षण विश्व: "मास्टर माईंड"मध्ये कारगिल विजय दिवस साजरा

**। पिंपरी चिंचवड ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

कारगिल विजय दिवसाचे औचित्य साधून भारतीय सैन्याच्या शौर्याचा गौरव करण्यासाठी आणि शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी कारगिल विजय दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका डॉ. प्रदीपा नायर आणि शाळेचे प्रशासक मनीकंदन नायर यांच्या हस्ते पुष्पचक्र समर्पण करून झाली. अमर जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी मौन पाळून शहिदांना आदरांजली वाहिली आणि राष्ट्रगीत म्हणण्यात आले. नरेंद्र अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली परेड करण्यात आली. देशभक्तीपर नृत्य ,भाषण, संगीत , प्रश्नमंजुषा हे कार्यक्रम सादर करून राष्ट्रीय अभिमान आणि आठवणीची भावना जागृत केली. शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.प्रदीपा नायर यांनी भाषणातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपणही देशाचे आपण देणे लागतो याची जाणीव करून दिली. विद्यार्थिनींनी “ए मेरे वतन के लोगो” हे गाणे सादर केले ज्याने त्यांच्या मधुर आवाजाने आणि हृदयस्पर्शी भावनांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. मस्केटियर्स ट्रेनिंग अकादमी तर्फे कमांडो ट्रेनिंग कोर्स 2024 - 25 च्या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. मास्टर माईंड ग्लोबल स्कूल मध्ये कारगिल विजय दिन साजरा करणे ही भारतीय सैन्याला स्मरणीय श्रद्धांजली होती ज्यामुळे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्ये राष्ट्राच्या वीरांबद्दल अभिमान आणि आदर निर्माण झाला.

# गरजू रुग्णांना शासकीय योजनांचा लाभ द्यावा

## महात्मा फुले जन आरोग्य योजनांबाबत आढावा बैठक

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मंदाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा (#MPJAY ) गरजू रुग्णांना प्रभावीपणे लाभ घेण्याकरिता पुढाकार घ्यावा, या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत न झालेल्या रुग्णालयानी नोंदणी करुन घ्यावी, याकामी राज्य शासनाच्यावतीने सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.**




यशदा येथे आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार कैलास पाटील, आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, आरोग्य उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, डॉ.प्रशांत वाडीकर ,जिल्हा शल्यचिसक डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई यांच्यासह रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. श्री. आबिटकर म्हणाले, आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने अतिशय महत्वाच्या योजना आहे. धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत जिल्ह्यात विविध रुग्णालये नोंदणीकृत असून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना आजारपणाच्या काळात सकारात्मक मदत देण्याची भावना ठेवावी. त्यांना सेवा करण्याकरिता पुढाकार घेतला पाहिजे.धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी प्रत्येकी १० टक्के याप्रमाणे एकूण २० टक्के खाटा आरक्षित करणे बंधनकारक असून त्याअनुषंगाने धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी प्रभावीपणे काम करावे, शासनाच्या निर्देशाप्रमाणे रुग्णांना खाटा उपलब्ध करुन द्याव्यात.पुणे जिल्ह्यात रुग्णांची संख्या तसेच वैद्यकीय उपचाराकरिता येणाऱ्या खर्चाचा विचार करता धर्मादाय रुग्णालयाची मोठी जबाबदारी आहे.

त्यामुळे गरजू रुग्णांना गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, सेवा दिल्यानंतर रुग्णाच्या अंगी रुग्णालयाप्रती समाधानाची भावना निर्माण झाली पाहिजे, यादृष्टीने काम करावे, असेही श्री. आबिटकर म्हणाले. डॉ. शेटे म्हणाले, शासनाच्या आरोग्य विषयक योजनांचा प्रत्येक गरजू रुग्णांना लाभ देण्याकरिता राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्यामुळे रुग्णालयाने पात्र रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा देवून सहकार्य करावे, याकामात हलगर्जीपणा होणार नाही, याबाबत रुग्णालय व्यस्थापनाने दक्षता घ्यावी, असेही डॉ. शेटे म्हणाले. मंदाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा (#MPJAY ) गरजू रुग्णांना प्रभावीपणे लाभ घेण्याकरिता पुढाकार घ्यावा, या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत न झालेल्या रुग्णालयानी नोंदणी करुन घ्यावी, याकामी राज्य शासनाच्यावतीने सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. यशदा येथे आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते.

### वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन द्याव्या

पिंपरी चिंचवड मोहन नगर येथील राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयाला आरोग्य मंत्री यांनी भेट देऊन बाहय रुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, औषधी भंडार, आहार विभाग, यांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच रुग्णांशीही संवाद साधला व अडीअडचणी जाणून घेतल्या. रुग्णांना चांगल्या सेवा सुविधा देण्यासाठी डॉक्टर व प्रशासन यांनी अधिक काळजीपूर्वक लक्ष द्यावे व दर्जेदार सेवा द्याव्यात अश्या सूचना यांनी या वेळी केल्या.